प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत–४१० २०१, जि. रायगड

जा.क्र.ससंसं/उद्यान/क.म./१९५/२०२२          दिनांक 21 JAN 2022

## जाहीर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभागातील निव्वळ कंत्राटी पध्दतीने १५ फेब्रुवारी, २०२२ ते १५ मार्च,२०२२ या कालावधीत शेतीविषयक विविध कामे करावयाची आहेत. उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या आणि काम करण्यास इच्छुक असणाऱ्या कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत–४१०२०१ जि. रायगड

प्रत : प्रसिध्दीसाठी

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड
२. मा. कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती/नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. ग्रामपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
५. संकेतस्थळ,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभागांतर्गत ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय: प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभाग येथे कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक.**

**संदर्भ** :जा.क्र.ससंसं/उद्यान/कं.म./ /२०२२, दिनांक :

वरील संदर्भित जाहीर प्रसिध्दी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभाग येथे कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक खालील प्रमाणे.

| **कामाचे तपशिल** | २०२१–२२ **या वर्षासाठी** (१५ फेब्रुवारी, २०२२ ते १५ मार्च,२०२२ ) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | एकूण रुपये ......................<br>अक्षरी ............................................................... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ..................................................

नांव : ..................................................

पत्ता : ................................................

# ठेकाबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

ठेकेदाराचीसही:.............................................

ठेकेदाराचे नांव:..........................................

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड

## दि १५/०२/२०२२ ते १५/०३/२०२२ या कालावधीत उद्यानविद्या विभागात करावयाच्या कामांची यादी.

१. काळीमिरी मातृवृक्षांना सिंचन व्यवस्था निर्माण करणे. (चारी खोदणे, पाईपलाईन गाडणे, लाटरल व ड्रीपर बसविणे इ.)
२. काळीमिरी मातृवृक्षांना झाडावर चढविण्यासाठी बांबूकाडीचा आधार देणे
३. काळीमिरी मातृवृक्षांना (Rapid multiplication block) नविन शेड बांधणी करणे व शेडनेट टाकणे
४. काळीमिरी कलमे करण्याकरीता माती वाहतूक करणे. माती व शेणखताचे मिश्रण तयार करून पिशव्या भरणे
५. भरलेल्या पिशव्या वाहतूक करून शेडमध्ये ओळीत लावणे
६. काळीमिरी कटींग चांगल्या फुटव्याकरीता शेड तयार करणे.
७. शेड तयार करण्यासाठी बांबू तोडणे, बांबू बांधणे व प्लॅस्टीक बांधणे ई. कामे करणे.
८. काळीमिरी कटींग (Cutting) तयार करणे. बुशशी नराडाची व IBA संजिटक प्रक्रिया करून पिशवीत लावणे.
९. काळीमिरी मातृवृक्षांचे आणि काळीमिरी कलमांचे (पिशव्यातील) व्यवस्थापन करो
१०. नर्सरीमधील तण काढणे, पाणी देणे व परीसर स्वच्छ ठेवणे. ह्युमिड अॅसीडची जिरवणी करणे.
११. फुटलेल्या काळीमिरी व न फुटलेली काळीमिरी वेगवेगळी करून व्यवस्थीत ओळीमध्ये लावणे.
१२. आयत्यावेळी उद्भवणारी इतर अनुषंगीक कामे करणे.